हितगुज

# योग्य रीतीने घेतलेले शेवगा पीक ठरेल फायदेशीर

## मधमाश्यांच्या माध्यमातून साध्य होते ५० टक्के अधिक उत्पादन




**दर्शना मोरे**
(मो.नं. ९६८९२१७७९०)
**पल्लवी घुले**
सहायक प्राध्यापिका
**संदीप विधाते**
सहायक प्राध्यापक
क.का. वाघ उद्यानविद्या महाविद्यालय, नाशिक






> शेवगा पीक कोरडवाहू असले तरी त्याला थोडेफार पाणी लागतेच. शेवगा हे पीक कशाही जमिनीत, कुठेही आणि कसेही येते, त्याला खत-पाणी नसले तरी चालते हा समज चुकीचा आहे. शेवग्याची बाग फायदेशीर ठरावी यासाठी इतर घटकांबरोबर खते देणे आणि ती समतोल असणे अत्यंत आवश्यक आहे. लागवडीच्या सुरुवातीस एक वर्षापर्यंत पाण्याचे व्यवस्थापन नियमित ठेवणेही गरजेचे आहे.

शेवगा हे एक कमी पाण्यात येणारे पीक आहे. शेवग्याची लागवड ही प्रामुख्याने दक्षिण भारतात मोठ्या प्रमाणावर केली जाते. बाजारात आज उपलब्ध असलेल्या विविध जाती साधारणतः २०० ते ३०० शेंगा एका झाडापासून देतात. मुख्य पीक आणि बांधावरील पीक म्हणून देखील शेवग्याची लागवड करता येणे शक्य आहे. भारतात आंध्र प्रदेश, तामिळनाडू आणि कर्नाटक राज्यांत शेवग्याची फार मोठ्या प्रमाणावर लागवड केली जाते. भारतातील आंध्र प्रदेश हे लागवड आणि उत्पादनाच्या बाबतीत क्रमांक एकचे राज्य आहे. त्यानंतर कर्नाटक आणि तामिळनाडू. दक्षिण भारतातून जुलै ते सप्टेंबर आणि मार्च- एप्रिल महिन्यांत शेवग्याची आवक जास्त असते. भारत देशाव्यतिरिक्त पाकिस्तान, श्रीलंका, जमैका, सिंगापूर, क्यूबा आणि इजिप्त या देशांत शेवग्याची लागवड केली जाते. तामिळनाडू राज्यात उन्हाळ्याच्या दिवसात शेवग्याची आवक मोठ्या प्रमाणावर असते.

**जमीन व हवामान** : शेवगा पिकाची लागवड ही उष्ण व समशीतोष्ण अशा दोन्ही हवामानात केलेली चांगली ठरते. या पिकास जास्त तापमान आणि अतिशय कमी तापमान सहन होत नाही. जमीन भुसभुशीत आणि सेंद्रिय पदार्थयुक्त अशी असावी. ज्या जमिनीत 'क्ले'चे प्रमाण जास्त आहे अशा जमिनीत लागवड शक्यतो करु नये, पाणी धरुन ठेवणारी जमीन पिकास मानवत नाही. २५ ते ३० डि.से. तापमान पिकाच्या वाढीसाठी अत्यंत पोषक ठरते. कमी पाण्यात येणारे हे पीक, पाणी मिळाल्यास फुलोऱ्यावर येण्यास उत्सुक असते. तापमान ४० डि.से. पेक्षा जास्त झाल्यास फुलगळ होते आणि रात्रीचे तापमान १६ डि.से. पेक्षा कमी झाल्यास फळधारणा होत नाही. शेवगा ४८ डि.से. तापमानत देखील तग धरु शकतो.

विविध प्रकारच्या जाती - कोईमतूर- १, कोईमतूर- २, कोकण रुचिरा, जाफना व पीकेएम- १, पीकेएम- २, प्रकाश-१ या जाती आढळतात.

**लागवड पद्धती** - शेवगा पिकाची लागवड बियांपासून तसेच काड्यांपासून केली जाते. काड्यांपासून केली जाणारी लागवड ही बहुवार्षिक शेवग्याची केली जाते, वार्षिक शेवग्याची लागवड ही बियांपासून करतात. साधारणतः १० ग्रॅम वजनात ३५



बिया असतात. (प्रति बी साधारणतः ०.२८८ ग्रॅम वजन). १ एकर क्षेत्रात लागवडी करिता २५० ग्रॅम बियाणे पुरेसे ठरते. (जवळपास एकूण ८७५ बिया, एक एकर क्षेत्रात २.५ X २.५ मीटर अंतरावर लागवड केल्यास ६४० रोप बसते.) बेड तयार करुन किंवा प्लास्टिक पिशव्या भरुन रोपांची निर्मिती केली जाते. बी लागवडीनंतर साधारणतः ३० दिवसांत रोप पुनर्लागवडीसाठी तयार होते. पिशवीत बियांची लागवड ही २ सें.मी. खोलीवर करावी. त्यात पिशवी भरण्यासाठी गाळ, माती, तसेच पूर्णपणे कुजलेले शेणखत किंवा त्याहून अधिक उत्तम असे निंबोळी पेंडचा वापर करता येईल.

शेवगा पिकाची लागवड पाऊस पडल्यानंतर करावी, पाण्याची उपलब्धता असेल तर जून- जुलै महिन्यात पाऊस वेळेवर नाही आला तरी लागवड केलेली चालते. उन्हाळ्यात आणि जास्त थंडीत लागवड करु नये.

साधारणतः महिन्यातून एकदा पाणी दिले तरी हे पीक उत्पादन देण्यास सक्षम आहे. जमिनीच्या प्रकारानुसार ड्रिप इरिगेशन असेल तर एका रोपाला शेवगा पिकाची २.५ X २.५ मीटरवर लागवड केल्यास एकरी ६४० रोप बसते. (१६०० रोप प्रति हेक्टर) लागवड करण्यापूर्वी ४५ X ४५ X ४५ सें.मी. आकाराचे खड्डे घेऊन त्यात शेणखत, गांडूळ खत, मॅन्कोझेब, सिंगल सुपर फॉस्फेट

मातीत टाकून त्यानंतर खड्डे भरुन लागवड करावी.

शेवगा लागवडीनंतर ७० ते ७५ दिवसांनी त्याचा वाढणारा शेंडा खुडल्यास जास्त प्रमाणात फांद्या मिळून फळांची संख्या वाढविण्यात मदत मिळते. ६० ते ७५ दिवसांत केलेल्या शेंडा खुडणे या क्रियेमुळे जास्तीत जास्त फांद्या मिळतात, त्यानंतर केलेल्या अशा प्रक्रियेमुळे मात्र हव्या त्या प्रमाणात जास्त फांद्या मिळत नाहीत. एका रोपास ६ ते १० फांद्या ठेवणे फायदेशीर ठरते.

खोलवर जाणारे सोटमूळ, कमीत कमी अशा संख्येत असणाऱ्या जमिनीस समांतर लांब जाणाऱ्या मुळ्या



(Lateral roots) आणि जमिनीवर पडणारी अल्प अशी सावली यामुळे शेवगा हे पीक उत्तम आंतरपिक म्हणून योग्य ठरते. शिवाय शेवगा पिकाच्या जमिनीवर पडणाऱ्या पानांमुळे नवीन लागवड होणाऱ्या पिकावरील पिथियम रोगाचे देखील नियंत्रण होण्यास मदत मिळते.

शेवगा पीक बहुतेक वेळेस मिरची, वांगी, कांदा, गवार, पिकात आंतरपीक म्हणून दक्षिणेकडील राज्यात घेतले जाते. गुजरात राज्यातील वडोदरा, अहमदाबाद तसेच काही इतर भागात शेवगा हे पीक बरेच ठिकाणी बांधावरील पीक म्हणून एक अतिरिक्त उत्पादन देणारे पीक आहे.

फुलोरा आणि फळधारणा : शेवगा पिकांस अनेक वेळेस वर्षभर फुले येत राहतात. परंतु प्रामुख्याने ऑक्टोबर ते नोव्हेंबर आणि एप्रिल ते मे या काळात आर्थिक फायदा मिळवून देतील इतकी फुले जास्त प्रमाणात मिळतात.

फूल उमलल्यानंतर परागकण सकाळी ९ ते १० आणि त्याच दिवशी संध्याकाळी ६.३० ते ७ या वेळेत जास्त सक्रिय असतात. शेवगा पिकांत परागीभवन क्रियेत मदत करणारे घटक जसे मधमाशी उपलब्ध असल्यास फळधारणा ही एकूण फुलांच्या ६४ ते ६८ टक्के इतकी असते, तर मधमाश्यांच्या अनुपस्थितीत फळधारणा केवळ ४२ ते ४७ टक्के इतकी असते. म्हणजेच एकंदर ५० टक्के उत्पादन हे केवळ मधमाश्यांच्या उपस्थितीत वाढते. जे शेतकरी मधमाश्या पालन आणि सोबत शेवगा लागवड करु इच्छितात त्यांनी २० ते २५ शेवगा रोपांसाठी एक मधमाश्यांची लाकडी बॉक्स ठेवण्यास हरकत नाही. फूल उमलल्यानंतर ६५ ते ७५ दिवसांत फळ जास्तीत जास्त लांबी आणि वजन प्राप्त करते. शेवगा पिकात फळ काढणीनंतर झाड जमिनीपासून साधारणतः १ मीटर अंतरावर कापून टाकतात, जेणेकरुन नवीन फूट येऊन त्यावर हवामानानुसार ४ ते ६ महिन्यात पुन्हा फळधारणा होते. तसेच फळे हाताने काढता येतील अशा उंचीवर रोपाची वाढ होते.

## शेवगा पिकाचे खत आणि पाणी व्यवस्थापन

शेवगा पीक कोरडवाहू असले तरी त्याला थोडेफार पाणी लागतेच. शेवगा हे पीक कशाही जमिनीत, कुठेही आणि कसेही येते, त्याला खत-पाणी नसले तरी चालते हा समज चुकीचा आहे. शेवग्याची बाग फायदेशीर ठरावी यासाठी इतर घटकांबरोबर खते देणे आणि ती समतोल असणे अत्यंत आवश्यक आहे. लागवडीच्या सुरुवातीस

एक वर्षापर्यंत पाण्याचे व्यवस्थापन नियमित ठेवणेही गरजेचे आहे.

शेवग्याची वाढ आणि उत्पादन हे केवळ जमिनीत उपलब्ध असलेल्या अन्नघटकांवर अवलंबून असले तरी शेवग्याची बाग कशा प्रकारच्या जमिनीप्रमाणात आणि कोणत्या वेळी दिली यावरच शेवगा बागेचे आयुष्य अवलंबून आहे. अपुऱ्या प्रमाणातील खतामुळे शेवग्याचे उत्पादन कमी येते. मध्यम व सकस जमिनीतील व समतोल अन्नद्रव्य दिलेल्या जमिनीत शेवग्याचे पीक चांगले येते. वरखते देताना नत्र, स्फुरद व पालाश प्रमाणात दिली जावीत आणि त्यानंतर त्या भागांना सेंद्रिय व असेंद्रिय खते दिली पाहिजे. आपल्याकडे स्फुरद व पालाश भरपूर प्रमाणात जमिनीत असली तरी शेवगा पिकाच्या गरजेच्या वेळी ती प्रमाणात उपलब्ध होत नाहीत. म्हणून खते देतेवेळी नत्र, स्फुरद व पालाश यांचे ३:१:४: हे प्रमाण राखले गेले पाहिजे.

## खत व्यवस्थापन

जमिनीमध्ये शेवग्याच्या झाडाला प्रतिवर्षी १० ते १५ किलो शेणखत प्रतिझाड द्यावे ७५ ग्रॅम नत्र (१६५ ग्रॅम युरिया) + ५० ग्रॅम स्फुरद (१३२ सिंगल सुपर फॉस्फेट) + ७५ ग्रॅम पालाश (१२० ग्रॅम म्युरेट ऑफ पोटॅश) द्यावे. खते देण्यासाठी प्रत्येक झाडाला त्याच्या विस्ताराप्रमाणे १५ ते २० सें.मी. खोलीचे गोलाकार आळे करावे व संपूर्ण शेणखत रोप लावताना द्यावे व पुढे प्रतिवर्षी छाटणी केल्यानंतर द्यावे. तसेच सर्व खते वर्षातून ४ वेळा विभागून द्यावी. त्यामुळे सूक्ष्म अन्नद्रव्ये प्रत्येक वेळेस ५ किलो सर्व खतात मिसळून द्यावे. तसेच



खते देताना गोलाकार आळे पद्धत किंवा झाडाजवळ १५ ते २० सें.मी. अंतरावर पहारीने खते दिली तर ती जास्त परिणामकारक ठरतात.

## वाढीचे व्यवस्थापन

शेवगा हे वेगाने वाढणारे झाड आहे. शेवगा पिकाच्या शेंगा तोडणीसाठी झाडाची वाढ व्यवस्थापन खूप महत्त्वाचे असते अन्यथा झाड उंच वाढते पर्यायी शेंगा तोडणी अवघड बनते. वाढ व्यवस्थापनासाठी शेवगा लागवडी नंतर चार-पाच महिन्यांनी पहिली छाटणी करावी. त्यासाठी खोड जमिनीपासून ३-३.५ फुटांवर छाटावे आणि चार- पाच फांद्या चोहोबाजूंनी वाढू द्याव्यात. नंतर ७-८ महिन्यांनी चार-पाच ठेवलेल्या फांद्या मुख्य खोडापासून १ मी. अंतरावर कट कराव्यात. यामुळे शेवगा वाढ नियंत्रण केल्यास शेंगा तोडणीसाठी सोपे होईल. दर दोन वर्षांनी शेंगांची तोडणी झाली की छाटणी करावी म्हणजे झाड नियमित उत्पादन देईल.



## काढणी व उत्पादन

शेवग्याची लागवड केल्यापासून ६ महिन्यानंतर शेंगा लागतात. शेवगा शेंग रसरशीत असतानाच तोडणी करावी खूप टणक झाल्यास शेंगेची चव कमी होते. प्रत्येकी झाडापासून वर्षाला ५० किलोपर्यंत शेंगा मिळतात.